महाळुंगे M.I.D.C. पोलीस स्टेशन
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय
पत्ता- एम.आय.डी.सी.चौक, चाकण-तळेगाव दाभाडे रोड,
महाळुंगे (इंगळे), ता-खेड, जि-पुणे 410501
मेल आय.डी. pimahalunge.pcpc-mh@gov.in

# प्रेस नोट दिनांक १५/१२/२०२४

**महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन तपास पथकाची धडाकेबाज कामगिरी :- मोटार सायकल चोरी करणा-या गुन्हेगाराकडुन चोरीच्या एकुण ०७ मोटार सायकल व त्यांचे सुट्टे भाग हस्तगत करत चोरीचे एकुण ०५ गुन्हे उघडकीस आणुन एकुण ३,१०,०००/- लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त.**

---------------------------------------------------------------------ooooo----------------------------------------------------

मा. पोलीस आयुक्त, श्री विनयकुमार चौबे सो, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांनी पिंपरी चिंचवड परिसरातील मोटार सायकल चोरी वर आळा घालण्याकरिता गुन्ह्यांचे क्राईम मॅपिंग करुन, नाकाबंदी,पेट्रोलिंग करुन तसेच मोटार सायकल चोरीच्या घटना घडलेल्या घटनास्थळावरील सीसीटिव्ही फुटेज पडताळणी करुन गुन्हेगारांचा शोध घेउन मोटार वाहन चोरीच्या गुन्हयांची उकल करण्यासाठी वेळोवेळी सुचना व मार्गदर्शन केले आहे.

त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. नितीन गिते, महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पेट्रोलिंग करून तसेच घटना घडलेल्या ठिकाणी सीसीटिव्ही फुटेज पाहुन आरोपीचा शोध घेण्यास सुरुवात केली. महाळुंगे पोलीस स्टेशन तपास पथक मोटार सायकल चोरीचे गुन्हे घडलेल्या ठिकाणी व आजुबाजुच्या परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्याव्दारे सातत्यपुर्ण व बारकाईने तपास करत असताना सारख्याच वर्णनाचे तीन इसम वेगवेगळया ठिकाणी माटारसायकल चोरी करीत असताना दिसुन आले. त्यांचे बाबत अधिक माहिती घेतली असता सदरचे चोरटे हे मंचर ता.आंबेगाव येथील असल्याची माहिती तपास पथकाचे पोलीस शिपाई मंगेश कदम यांना मिळाली. तपास पथकाचे अधिकारी सपोनि कल्याण घाडगे व अंमलदार यांनी लागलीच खानवस्ती, मंचर ता आंबेगाव जि.पुणे येथुन सदर इसमांना ताब्यात घेउन त्यांच्याकडे कौशल्यपूर्ण तपास केला असता त्यांनी महाळुंगे पोलीस स्टेशन हद्दीतुन तसेच जवळपासच्या परिसरातुन वेगवेगळया ठिकाणावरुन एकूण ०७ मोटार सायकल चोरी केल्या असल्याची कबुली दिली. त्यांच्याकडून चोरी केलेल्या एकूण ०४ मोटारसायकल व ३ मोटारसायकलचे चेसीस, इंजीन, मॅकव्हिल असे सुटटे भाग हस्तगत करण्यात आलेले असून खालीलप्रमाणे गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गु.र.नं. व कलम | चोरीस गेलेला मा | किंमत |
|---|---|---|---|---|
| ०१ | महाळुंगे MIDC पोलीस स्टेशन | ८२२/२०२४ बीएनएस ३०३(२) | **MH09GT6761** | ५५,०००/- |
| ०२ | महाळुंगे MIDC पोलीस स्टेशन | ८२३/२०२४ बीएनएस ३०३(२) | **MH14LW7448** | ५५,०००/- |
| ०३ | महाळुंगे MIDC पोलीस स्टेशन | ८३८/२०२४ बीएनएस ३०३(२) | **MH14JS5093** | ३०,०००/- |
| ०४ | तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन | २१३/२०२२ भादवि क ३७९ | **MH32N0399** | ५५,०००/- |
| ०५ | चंदन नगर पोलीस स्टेशन,पुणे शहर | ४०९/२०२४ बीएनएस ३०३(२) | **MH12TX0837** | ५५,०००/- |
| | तसेच मंचर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण व पारनेर पोलीस स्टेशन जिल्हा अहिल्यानगर येथुन चोरी केलेल्या दोन स्प्लेंडर मोटारसायकलचे सुट्टे भाग चेसीस, मॅकव्हील, इंजिन हस्तगत करण्यात आले आहेत. | | | ६०,०००/- |
| | **एकुण जप्त मुदेमाल किंमत - ३,१०,०००/- रुपये** | | | |

**अटक आरोपी**

१) अतुल ऊर्फ मन्या संदिप गावडे, वय-१९ वर्षे, रा. खाणवस्ती, मंचर ता. आंबेगाव ता खेड जि पुणे
२) गणेश मच्छिंद्र भगत वय १८ वर्षे, रा. रा. खाणवस्ती, मंचर ता. आंबेगाव ता खेड जि पुणे
३) अजित कैलास जाधव वय २३ वर्षे, रा. ठाकरवाडी जवुळके खुर्द, ता खेड जि पुणे
(मो/सा चे सुटटे भाग विकत घेणारा)

**आरोपींची मोडस-**

मॅकव्हिल असलेल्या स्प्लेंडर मोटारसायकल चोरी करून त्या आंबेगाव व खेड तालुक्याच्या सिमावर्ती भागात जंगलात नेउन त्या खोलून त्यांचे मॅकव्हिल व सुटटे भाग वेगळे करून विक्री करणे व उर्वरीत सांगाडा निर्जन ठिकाणी अथवा विहीरीत फेकून नष्ट करणे

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त **श्री.विनयकुमार चौबे,** मा.पोलीस सहआयुक्त, **डॉ.शशिकांत महावरकर**, मा.अपर पोलीस आयुक्त **श्री.वसंत परदेशी,** मा.पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ ३, **डॉ. शिवाजी पवार,** मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, चाकण विभाग **श्री राजेंद्रसिंग गौर** यांचे सुचना व मार्गदर्शना खाली **वरिष्ठ पोलीस निरीक्षक** श्री. नितीन गिते**, पोलीस निरीक्षक(गुन्हे)** श्री. प्रविण कांबळे, **सहा. पोलीस निरीक्षक** कल्याण घाडगे, **पोहवा** अमोल बोराटे, विठ्ठल वडेकर, युवराज बिराजदार, किशोर सांगळे, **पोना** संतोष काळे, **पोकॉ/** शिवाजी लोखंडे, राजेंद्र खेडकर, संतोष वायकर, गणेश गायकवाड, मंगेश कदम, अमोल माटे तसेच पोलीस उपायुक्त परिमंडळ ३ कार्यालय येथील पोहवा राजु जाधव यांनी केली आहे.

(नितीन गिते)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाणे,
पिंपरी चिंचवड